कार्यालय पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक विभाग, जालना
टोल फ्री क्रमांक - 1064
कार्यालय दुरध्वनी क्र :- 02482-220252

## :: प्रेस नोट ::

दिनांक :- 17.05.2020.

**पोलीस ठाणे मौजपुरी जि जालना येथील पोलीस हवालदार श्री. काशिनाथ रामभाऊ जायभाये वय 51 वर्ष व्यवसाय नोकरी पोलीस हवालदार/ ब नं 482 नेमणुक पोलीस ठाणे मौजपुरी, रा सर्व्हे नं 488 पोलीस कॉलनी, जालना यास 1,000/- रुपयांची लाच घेतांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, जालना च्या पथकाने पकडले.**

| | | | |
|---|---|---|---|
| 1 | आरोपीचे नाव, हुद्दा व पत्ता | :- | **लोकसेवक श्री. काशिनाथ रामभाऊ जायभाये वय 51 वर्ष व्यवसाय नोकरी पोलीस हवालदार/ ब नं 482 नेमणुक पोलीस ठाणे मौजपुरी, रा सर्व्हे नं 488 पोलीस कॉलनी, जालना मुळ गाव मु बायगाव पो देऊळगाव मही ता देऊळगाव राजा जि बुलढाणा.** |
| 2 | गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | **दि- 17.05.2020 रोजी हिवरा रोषणगाव ता जि जालना** |
| 3 | लाचेची रक्कम | :- | **1,000/- रुपये.** |

याबाबत हकीगत अशी की, यातील तक्रारदार यांनी तक्रार दिली की, पोलीस ठाणे मौजपुरी जि जालना येथे त्यांनी दिलेल्या तक्रारीवरुन गैर अर्जदार यांचेवर कार्यवाही करणेसाठी व गैर अर्जदार यांनी तक्रारदार यांचे विरुध्द दिलेल्या तक्रारीमध्ये यातील तक्रारदार यांचेवर कार्यवाही न करता मदत करण्यासाठी आलोसे श्री काशिनाथ रामभाऊ जायभाये पोलीस हवालदार/ ब नं 482 यांनी तक्रारदार यांचेकडे 5,000/- रूपये लाचेची मागणी केली. सदर कामासाठी तक्रारदार यांना लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथे संपर्क साधून तक्रार दिली. सदर तक्रारीवरुन दिनांक 15.05.2020 रोजी पडताळणी केली असता आलोसे यांनी तक्रारदार यांचेकडे 5,000/- रुपयेची लाचेची मागणी केली, आणि आज दिनांक 17.05.2020 रोजी तडजोडीअंती लोकसेवक श्री काशिनाथ रामभाऊ जायभाये पोलीस हवालदार/ ब नं 482 यांनी तक्रारदार यांचेकडुन 1,000/- रुपये लाचेची रक्कम स्वत: पंचासमक्ष लाच स्वीकारली असतांना त्यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालनाचे पथकाने तक्रारदार यांचे राहते घरी हिवरा रोषणगाव ता जि जालना येथे रंगेहाथ पकडण्यात आले.

लोकसेवक श्री. काशिनाथ रामभाऊ जायभाये वय 51 वर्ष व्यवसाय नोकरी पोलीस हवालदार/ ब नं 482 नेमणुक पोलीस ठाणे मौजपुरी, रा सर्व्हे नं 488 पोलीस कॉलनी, जालना मुळ गाव मु बायगाव पो देऊळगाव मही ता देऊळगाव राजा जि बुलढाणा यांचे विरुध्द गुन्हा दाखल करण्याबाबत पुढील कार्यवाही चालु आहे.

सदरची सापळा कार्यवाही पोलीस अधिक्षक श्री.अरविंद चावरीया, अपर पोलीस अधिक्षक डॉ. अनिता जमादार, ला.प्र.विभाग औरंगाबाद, पोलीस उप अधिक्षक श्री.रविंद्र डी.निकाळजे यांचे मार्गदर्शनाखाली सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. संग्राम ताटे तसेच कर्मचारी श्री.मनोहर खंडागळे, श्री.सचिन राऊत, श्री. शिवाजी जंमधडे, श्री. ज्ञानेश्वर म्हस्के व चालक श्री. प्रविण खंदारे, श्री. आरेफ शेख यांनी पार पाडली.

**तसेच अँन्टी करप्शन ब्युरो कडुन आवाहन करण्यात येते की, कोणी लोकसेवक शासकीय कामासाठी लाचेची मागणी करीत असल्यास किंवा खाजगी व्यक्ती मार्फत कोणी लाचेची मागणी करीत असल्यास 02482-220252, तसेच टोल फ्री क्रमांक 1064 वर संपर्क करावा. तसेच पोलीस उप अधिक्षक जालना मो.नं. 8975762906, पोलीस निरीक्षक मो.नं. 8390757835, 9823216788 वर संपर्क करावा.**

पोलीस उप अधिक्षक,
ला प्र वि, जालना.